लोकसभा पोटनिवडणूक - २०१८ करिता पोलीस अधिक्षक, भंडारा यांनी बंदोबस्तासाठी भाडेतत्त्वावर अधिग्रहित केलेल्या खाजगी बसेसच्या भाड्यापोटी देय असलेली रु. ५,८९,०००/- इतकी रक्कम अदा करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१८/९१०८/प्र.क्र.३४६/ विशा १ अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १९ मार्च, २०१९.

संदर्भ :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/ ३० / ३५७७ / वाह.अधि.भंडारा /१७३/ २०१८, दिनांक ०१.१०.२०१८.

प्रस्तावना :-

११- भंडारा - गोंदिया लोकसभा मतदार संघात दिनांक २८.०५.२०१८ रोजी घेण्यात आलेल्या लोकसभा पोटनिवडणूक - २०१८ करिता बंदोबस्तासाठी पोलीस अधिक्षक, भंडारा यांनी भाडे तत्वावर ६२ खाजगी बसेस अधिग्रहित केल्या होत्या. सदर अधिग्रहित करण्यात आलेल्या खाजगी बसेसच्या भाड्यापोटी रु. ५,८९,०००/- (रु. पाच लाख एकोणनव्वद हजार फक्त) इतक्या झालेल्या खर्चास मंजूरी मिळण्याबाबत तसेच सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात उपलब्ध असलेल्या अनुदानातून सदर रक्कम खर्च करण्यास मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती .

शासन निर्णय:-

दिनांक २८.०५.२०१८ रोजी पार पडलेल्या ११- भंडारा - गोंदिया लोकसभा मतदार संघातील लोकसभा पोटनिवडणुकीच्या पोलिस बंदोबस्ताकरीता अधिग्रहित केलेल्या खाजगी बसेसचा रु. ५,८९,०००/- (रु. पाच लाख एकोणनव्वद हजार फक्त) इतका भाडेखर्च अदा करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे.

सदरचा खर्च मागणी क्र. " बी-१, २०५५, पोलीस (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस बल, दत्तमत (२०५५०१६८) ५०- इतर खर्च " या लेखाशिर्षाखाली सन २०१८- १९ या वित्तिय वर्षातील उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्तिय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उप विभाग - १ मधील अनुक्रमांक ६, नियम - ४० अन्वये प्रशासनिक विभागास असलेल्या पूर्ण अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३१९१६२३५५२१२९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vijay Damodar Patil

Digitally signed by Vijay Damodar Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb42793fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay Damodar Patil
Date: 2019.03.19 16:26:13 +05'30'

(विजय पाटील)
उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२.विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर.

३.जिल्हाधिकारी, भंडारा.
४.पोलीस अधिक्षक, भंडारा.
५.महालेखापाल- २ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
६.अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
७.जिल्हा कोषागार अधिकारी, भंडारा.
८.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९.निवडनस्ती.